दिनांक 19 / 08 /2025 रोजीचा प्रशासकीय ठराव क्रमांक 85

**विषय -** विटा शहर दुसरी सुधारित विकास योजना मधील जुना गट नंबर २८० याचा शेती तथा नाविकास झोन मधून रहिवास झोन मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबत.

**संदर्भ –** १.श्री कय्युम गुलामदस्तगीर तांबोळी , श्री नाझीम गुलामदस्तगीर तांबोळी यांचा दिनांक २३/०५/२०२५ रोजीचाअर्ज.
२.दिनांक३१/०७/२०२५ नेरचनासहाय्यक, सहाय्यक नगररचनाकार, मुख्याधिकारी यांचे कडील मंजूर टिपणी.

विटा शहर मंजूर विकास योजना (दुसरी सुधारित) ही TPS-2009/1138/CR-1964/09/UD-13 दिनांक ३१/०८/२००९ ने मंजूर झाली असून दिनांक ३०/१०/२००९ पासून अमलात आलेली आहे. त्यानुसार जुना गट नंबर २८० हे शेती तथा ना विकास विभागात समाविष्ठ आहेत. सदर क्षेत्राचे झोन बदल करून रहिवासी झोन करून मिळावा याबाबत मागणी अर्ज श्री कय्युम गुलामदस्तगीर तांबोळी , श्री नाझीम गुलामदस्तगीर तांबोळी यांनी दिनांक २३/०५/२०२५ रोजी प्राप्त झाला आहे. दिनांक ३१/०७/२०२५ नेरचनासहाय्यक, सहाय्यक नगररचनाकार, मुख्याधिकारीयांचे कडीलमंजूरटिपणी नुसारसदर क्षेत्र रहिवास झोन मध्ये समाविष्ठ केलेस खालील मुद्यांचा विचार करता योग्य ठरणार आहे.

१. सदर क्षेत्र रहिवास झोन ला लागून आहे व पश्चिमेस २४ मी रुंदीचा प्रस्तावित डीपी रस्ता आहे, तसेचदक्षिणेकडील ३० मी कराड-विटा डीपी रस्त्यापासून ९ मी रुंदीचा पोहोच रस्ता स्वखर्चातून उपलब्ध करणार असलेबाबत प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. तसेच सदर जमीन सर्वसाधारण समपातळीची आहे.

२. विषयांकित फेरबदलाखालील जागा गावठाणापासून सुमारे १.५ किमी अंतरावर स्थित आहे. वाढत्या लोकसंख्येचा विचार करता सदर क्षेत्र रहिवास झोन मध्ये समाविष्ठ केलेस अस्तित्वातील रहिवास झोन वरील ताण कमी होणार आहे.

३. विटा शहरात जास्त प्रमाणात उंच इमारती एवजी गुंठेवारी सदृशविकासवस्वतंत्र घर बांधणेस लोकांचा कल असलेचे दिसून येते. त्यामुळे अधिकचा रहिवास झोन शहरास आवश्यक आहे.

४. सदर क्षेत्र रहिवास झोन मध्ये समाविष्ठ केलेस विकास शुल्क व कर संकलनाच्या माध्यमातून नगरपालिकेचे उत्तपन्न वाढ होणार आहे अतिरिक्त महसूलाचा उपयोग सार्वजनिक सेवांसाठी आणि आधारभूत सुविधांच्या सुधारण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो.

५. सदर क्षेत्रापासून ७०० मी अंतरावर नगरपालिकेची पाण्याची टाकी असून तिथून सदर क्षेत्रास पाणी पुरवठा करणे सहज शक्य आहे. तसेच सदर क्षेत्र हे विटा कराड रस्त्यापासून३०० मी अंतरावर असून येथे अग्निशमन सुविधा, कचरा संकलनासाठी घंटा गाडी व इतर आरोग्य विषयक सुविधा पुरवणे शक्य आहे.

पान नं 2 वर

तरी वरील मुद्द्यांचा विचार करून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये गौण फेरफार करणेस मंजुरी देतआहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबद्ध कार्यवाही करणेत यावी

सही/-
(डॉ विक्रम बांदल)
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा